बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम २०१२ यातील तरतूदीची अंमलबजावणी राज्यातील प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमध्ये करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासननिर्णयक्रमांकः प्राशिधो २०१३/प्र.क्र.२४/प्राशि-१**

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

तारीख:२२ फेब्रुवारी, २०१३

**शासन परिपत्रक —**

बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम २०१२ हा केंद्र सरकारचा कायदा दिनांक १४ नोव्हेंबर, २०१२ पासून अंमलात आलेला आहे. या कायद्याखालील नियमावली देखील दिनांक १४ नोव्हेंबर, २०१२ रोजी केंद्र सरकारने लागू केलेली आहे. उपरोक्त अधिनियम २०१२ मधील कलम ५ व ९ नुसार लैंगिक अपराधाचे वर्गीकरण करताना त्याकरिता कलम ६ व १० नुसार सर्वसाधारणत: ७ ते १० वर्ष कैद (यामध्ये जन्मठेपेपर्यंत वाढ होऊ शकते) तसेच दंड अशी शिक्षा देय आहे. कलम १९ नुसार बालकांविरूध्द होणाऱ्या लैंगिक अपराधाबाबत माहिती असणाऱ्या व्यक्तीने त्याबाबत तात्काळ विशेष किशोर पोलिस पथक (Special Juvenile Police Unit) अथवा स्थानिक पोलिस स्टेशनला कळविणे बंधनकारक आहे. याप्रमाणे माहिती न कळविणाऱ्या व्यक्तीस कलम २१ नुसार ६ महिन्यापर्यंतची कैद अथवा दंड किंवा दोनही शिक्षा (दंड व कैद) होऊ शकते.

१) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी १८ वर्षे वयोगटापर्यंतच्या बालकास बालक म्हणून समजण्यात येणार आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील बालके शैक्षणिक प्रवाहात असणे अपेक्षित आहे. बालकांचे लैंगिक

अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम २०१२ मध्ये नमूद वयोगटातील बालकांचा सर्वसाधारणत: ६ वर्षे वयानंतर बराचसा कालावधी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जातो. त्यांचेविरुध्द होणाऱ्या लैंगिक अपराधाबाबत माहिती झाल्यावर संबंधित शैक्षणिक संस्था व्यवस्थापन/ शिक्षक व शाळा यांनी अधिनियमातील तरतूदीनुसार स्थानिक पोलिस स्टेशन अथवा विशेष किशोर पोलिस पथक यांना कळविणे आवश्यक आहे. अन्यथा दंडनीय कारवाई होऊ शकते. या अधिनियमातील तरतूदींबाबत जागृती निर्माण झाल्यास त्याचा अनुकूल परिणाम बालकांविरुध्द होणारे लैंगिक अपराध/शोषणाची प्रकरणे कमी होण्यासाठी होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम २०१२ तसेच त्याखालील नियम २०१२ यातील तरतूदी विचारात घेऊन जागृत राहून कार्यवाही करावी व बालकांवर होणारी लैंगिक अपराधाची प्रकरणे कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. याशिवाय सर्व शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व शाळा व्यवस्थापनांना उपरोक्त तरतूदींबाबत कळवावे अशाही सूचना या परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२२२१५२१३७४०२१असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपालयांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.02.26 16:41:23 +05'30'

(ना.उ.रौराळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

२. मा. मंत्री (शालेय शिक्षण),

३. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण),

४. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),

५. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),

६. मा. मुख्य सचिव याचे स्वीय सहायक,

७. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

८. सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,

९. सर्व विभागीय आयुक्त,

१०. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

११. सचिव, राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, शासकीय परिवहन सेवा केंद्राजवळ,वरळी पोलिस कॅम्प, वरळी, मुंबई - २५

१२. सर्व जिल्हाधिकारी,

१३. सर्व आयुक्त, महानगरपालिका,

१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,

१६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१७. शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१८. शिक्षण संचालक(प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१९. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे,

२०. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,

२१. संचालक,महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन

२२. मंडळ(बालभारती), पुणे,

२३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

२४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

२५. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद,

२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद,

२७. सर्व प्रशासन अधिकारी, नगर परिषद/ कटक मंडळे,

२८. शिक्षण निरीक्षक (पश्चिम/ दक्षिण/ उत्तर), बृहन्मुंबई

२९. समितीचे सर्व अशासकीय सदस्य (महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचेव्दारा)

३०. निवड नस्ती (प्राशि-१ कार्यासन)